**ठळक बातम्या**

- विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण /विद्यार्थीनींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं राष्ट्रपतींचं पुण्यातल्या कार्यक्रमातून शैक्षणिक संस्थांना आवाहन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन देशांच्या दौऱ्यात ब्रुनेईमधे दाखल /हा दौरा आसियान क्षेत्रातल्या देशांबरोबर भारताची भागीदारी आणखी मजबूत करेल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास
- देशाची संरक्षण सज्जता वाढवण्यासाठी २ लाख ४५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रस्तावांना केंद्र सरकारची मंजुरी
- मुंबईत २७ व्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेला प्रारंभ /ई-गव्हर्नन्स हा विकासाचा एक मूलभूत घटक असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

  **आणि**

- छत्तीसगडमधे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत ९ माओवादी ठार

<><><><><>

महाराष्ट्र विधान परिषदेनं स्थापनेपासून आत्तापर्यंत गेल्या १०३ वर्षांमध्ये इथल्या लोकांच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी काम केलं आणि जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका बजावली आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले आहेत. त्या आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या सभागृहानं वादविवाद आणि संवादाची परंपरा कायम ठेवून लोकशाही मजबूत केली, असं त्या म्हणाल्या. याच सभागृहाचे सभापती वि. स. पागे यांनी मांडलेली रोजगार हमी योजनेची संकल्पना पुढं मनरेगाच्या रुपानं राष्ट्रीय पातळीवर राबवली गेली, याचं स्मरणही त्यांनी केलं.

भारताची अर्धी लोकसंख्या महिलांची आहे आणि त्यांच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगती होत नाही, असं राष्ट्रपतींनी सांगितलं. महाराष्ट्राच्या लेकी आणि महिला निश्चितपणे देशाचा गौरव वाढवतील, असं त्या म्हणाल्या.

तत्पूर्वी, ‘वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व’ या विषयावरच्या ग्रंथाचं प्रकाशन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. तसंच २०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंतच्या उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, आणि इतर यावेळी उपस्थित होते.

मुर्मू यांनी आज मुंबईत आल्यावर चैत्यभूमी दादर इथं जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

राष्ट्रपतींनी आज सकाळी पुण्यात सिम्बायोसिस विद्यापीठाच्या एकविसाव्या दीक्षांत समारंभाला संबोधित केलं. शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थीनींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करायला हवं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. देशाच्या विकासात महिलांचा अविभाज्य वाटा आहे. मूल्याधारित शिक्षण देणं आणि विद्यार्थ्यांना समाजाची संस्कृती आणि गरजा समजावून सांगणं हे शैक्षणिक संस्थांचं ध्येय असायला हवं, असं त्या म्हणाल्या. समाजातल्या वंचित घटकांचा विचार करून, आरोग्य सेवा उत्पादनं विकसित करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन देशांच्या दौऱ्यावर असून, आज दुपारी ते ब्रुनेईची राजधानी बंदर सेरी बेगवान इथं पोहोचले. औपचारिक स्वागतानंतर, प्रधानमंत्री कार्यालयात ब्रुनेईचे युवराज हाजी अल-मुहतादी बिल्लाह यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी बंदर सेरी बेगवान इथं भारतीय उच्चायुक्तालयाच्या नवीन कार्यालयाचं उद्घाटन केलं. ब्रुनेई इथल्या भारतीय समुदायानं प्रधानमंत्री मोदी

यांचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं.

भारत-ब्रुनेई धोरणात्मक संबंधांना ४० वर्ष पूर्ण होत असून, या पार्श्वभूमीवर भारताचे प्रधानमंत्री पहिल्यांदाच या देशाला भेट देत आहेत.

आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी उद्या सिंगापूरला रवाना होतील. यावेळी ते सिंगापूरचे राष्ट्राध्यक्ष थर्मन षणमुगररत्नम, प्रधानमंत्री लॉरेन्स वोंग यांच्यासह मंत्रिमंडळातल्या इतर वरिष्ठ नेत्यांची भेट घेतील. सिंगापूरमधल्या व्यापारी समुदायाशी देखील ते संवाद साधतील.

सिंगापूरबरोबरच्या विशेषतः प्रगत उत्पादन, डिजिटलायझेशन आणि शाश्वत विकासाच्या नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रांमधल्या धोरणात्मक भागीदारीवर चर्चा करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे. आपला हा दौरा या दोन्ही देशांसह, आसियान क्षेत्रातल्या देशांबरोबरची भारताची भागीदारी आणखी मजबूत करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

देशाची संरक्षण सज्जता वाढवण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं एक लाख ४५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण खरेदी परिषदेची बैठक झाली. या बैठकीत १० भांडवली अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी दिली गेली. या सोबतच या बैठकीत लढाऊ वाहनं, हवाई संरक्षणविषयक प्रक्षेपक नियंत्रक रडार, डॉर्नियर-२२८ विमाने तसंच गस्तीच्या अत्याधुनिक जहाजांच्या खरेदीलाही मंजुरी दिली गेली.

<><><><><>

पश्चिम बंगालच्या विधानसभेत आज अपराजिता महिला आणि बालक अत्याचार विरोधी विधेयक आवाजी मतदानानं मंजूर झालं. कोलकाता इथं एका महिला डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक

आणलं आहे. त्याला राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर ते राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवलं जाईल.

या विधेयकात बलात्कार आणि लैगिंक छळासाठी कठोर शिक्षा, तसंच फाशीच्या शिक्षेची तरतूद केली असल्याचं मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सभागृहात विधेयकावर चर्चा करताना सांगितलं.

<><><><><>

जागतिक बँकेनं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज ७ टक्क्यापर्यंत वाढवला आहे. याआधी जागतिक बँकेनं ६ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढीचा अंदाज व्यक्त केला होता खासगी गुंतवणुकीसारख्या महत्त्वाच्या घटकांमुळे भारताची आर्थिक वाढ मजबूत राहील, असं बँकेनं म्हटलं आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही भारताच्या जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा सुधारित अंदाज दिला आहे, त्यानुसार ही वाढ ७ टक्के राहिल.

<><><><><>

ई-गव्हर्नन्स हा विकासाचा एक मूलभूत घटक असून तो सरकारला अधिक जबाबदार, सर्वसमावेशक आणि नागरिक केंद्रित बनण्यासाठी सहायक असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित ई-गव्हर्नन्स या विषयावरच्या २७व्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना बोलत होते. ‘विकसित भारत- सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा वितरण’ ही या परिषदेची संकल्पना आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी उपस्थित होते.

ई-गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचं माध्यम आहे. त्यातल्या पारदर्शकतेमुळे सामान्य नागरिकांचा  प्रशासनावरचा विश्वास वाढत असल्याचं मुख्यमंत्री  म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम अतिशय कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात केवळ ई गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचं त्यांनी सांगितलं.

ई गव्हर्नन्स हे सुशासनाचं मूलभूत तत्व असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार 2024 विजेत्यांचा उपमुख्यमंत्री फडनवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

<><><><><>

छत्तीसगडमधे, आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत ९ माओवादी मारले गेले. बस्तर विभागातल्या दंतेवाडा आणि बिजापूर जिल्ह्यांच्या सीमेवर ही चकमक उडाली. या भागात मोठ्या संख्येनं माओवादी असल्याची माहिती सुरक्षादलांना मिळाली होती. त्यानुसार केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जिल्हा राखीव सुरक्षारक्षकांचं संयुक्त पथक एंद्री गावाजवळ त्या भागात पाठवलं. त्यांची शोधमोहिम सुरु असताना माओवाद्यांशी त्यांची चकमक उडाली. चकमकीनंतर ९ माओवाद्यांचे मृतदेह तसंच काही शस्त्रास्त्र सापडली. शोधमोहिम अजूनही सुरु आहे.

<><><><><>

महाराष्ट्र एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच सेवा सुविधा मिळाव्यात, घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, तसंच इतर सुविधाही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच असाव्यात ही त्यांची प्रमुख मागणी आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कृती समितीनं राज्य सरकारला निवेदन देऊन सुद्धा त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही, त्यामुळे हा बेमुदत संप सुरु केला असल्याचं कर्मचाऱ्यांनी सांगितलं.

एसटी कामगारांच्या सर्व संघटना यात सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे. मात्र यामुळे प्रवाशांचे हाल होत असल्याचं आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत उद्या बैठक घेऊन चर्चेतून मार्ग काढू, कर्मचाऱ्यांनी संप करु नये, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मालवण राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याच्याविरोधात पोलिसांनी लूकआऊट नोटीस जारी केली आहे. जयदीप याच्यावर पुतळ्याच्या बांधकामात हलगर्जीपणा केल्याचा आरोप आहे. पुतळा कोसळल्याच्या दिवसापासून जयदीप फरार आहे. या प्रकरणातला दुसरा आरोपी चेतन पाटील याला यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.

<><><><><>

त्रिपुरा विधानसभेत आज झालेल्या राज्यसभा निवडणुक मतदानासाठी काँग्रेसचे आमदार आले नाहीत. यामुळे इंडीया आघाडीतील मतभेद समोर आले असल्याचं भाजपानं म्हटलं आहे. भाजपानं राजीव भट्टाचार्जी यांना तर सीपीआय(एम)नं सुधन दास यांना उमेदवारी दिली आहे. देशभरात काँग्रेस भाजपच्या विरोधात असल्याचा दावा करते परंतु त्रिपुरात त्यांनी त्यांच्या आमदारांना राज्यसभेच्या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार वापरायला सांगितलं नसल्याची टीका विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि माकपचे ज्येष्ठ नेते जितेंद्र चौधरी यांनी केली.

<><><><><>

रस्त्यावर प्रवास करताना नागरिकांची सुरक्षितता सर्वात महत्त्वाची असल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी

दिल्लीत टनलिंग इंडियाच्या दुसऱ्या परिषदेला संबोधित करत होते. भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी सरकार काम करत असल्याचं ते यावेळी म्हणाले. कोणताही  प्रकल्प यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञान, आर्थिक व्यवहार्यता, कच्च्या मालाची उपलब्धता आणि तयार उत्पादनाचं विपणन यावर भर द्यायला हवा, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि केनिया यांनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या संयुक्त संरक्षण सहकार्य समितीच्या तिसऱ्या सत्रादरम्यान संरक्षण सहकार्यावर चर्चा केली. केनियाच्या शिष्टमंडळानं दिल्ली इथं भारतीय संरक्षण उद्योगाच्या प्रतिनिधींची भेट घेतली. या प्रतिनिधींच्या क्षमतेवरच्या चर्चेसाठी हे शिष्टमंडळ पुण्यालाही भेट देणार आहे.